# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण, आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांक:- २२/११/२०१८

### सिन्नर एम.आय.डी.सी.परिसरात अवैधरित्या अग्निशस्त्र बाळगणारा परप्रांतीय गजाआड देशी बनावटीचे पिस्टल व गावठी कट्टयासह व ०३ जिवंत काडतुसे जप्त - स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

---

जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था परिस्थितीवर नियंत्रण तसेच गुन्हेगारीस प्रतिबंध होणेसाठी नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांनी सत्वर कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहे. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांचे पथकाची धडक कारवाई सुरू आहे. **सिन्नर एम.आय.डी.सी.** परिसरात अवैधरित्या अग्निशस्त्रे बाळगणारे परप्रांतीय इसमास स्थागुशाचे पथकाने ताब्यात घेतले असुन त्याचे कब्जातुन **०१ देशी बनावटीचे पिस्टल व ०१ गावठी कट्टयासह ०३ जिवंत काडतुसे** जप्त करण्यात आले आहे.

आज दिनांक २२ नोव्हेंबर २०१८ रोजी दुपारी १२:०० वाचे सुमारास स्थानिक गुन्हे शाखेचे पथकातील अधिकारी व कर्मचारी सिन्नर एम.आय.डी.सी. परिसरात मालाविरूध्दचे गुन्हयातील सराईत गुन्हेगारांचा शोध घेत असतांना खब-यामार्फत मिळालेल्या गुप्तबातमी नुसार, सिन्नर शिर्डीरोडवर मुसळगाव एम.आय.डी.सी. परिसरात बेदमुथा कंपनीसमोर काही परप्रांतीय इसम हे अवैधरित्या अग्निशस्त्र बाळगुन गुन्हा करण्याचे तयारीत असल्याचे खात्रीशीर रित्या समजले. त्यानुसार स्थागुशाचे पथकाने मुसळगाव एम.आय.डी.सी. परिसरातील बेदमुथा कंपनीसमोर सापळा रचुन संशयीत **इसम नामे  रामबाबु हिरालाल गौतम, वय ४५,** मुळ रा. भारतगंज, जि.अलाहाबाद, राज्य उत्तरप्रदेश **हल्ली** मुसळगाव एम.आय.डी.सी., सिन्नर, ता.सिन्नर यास पाठलाग करून ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेले इसमाचे कब्जात असलेले होंडा ॲक्टीव्हा मोपेड दुचाकीचे डिक्कीत ०१ देशी बनावटीचे पिस्टल, ०१ गावठी कट्टा व ०३ जिवंत काडतुसे मिळुन आले. सदर इसमाकडे चौकशी करता त्याचेकडे कोणताही शस्त्र परवाना मिळुन आला नाही, त्याचे कब्जातुन **०१ देशी बनावटीचे पिस्टल, ०१ गावठी कट्टा व ०३ जिवंत काडतुसे, ०१ मोबाईल फोन** व गुन्हयात वापरलेली **होंडा ॲक्टीवा मोपेड** दुचाकी असा **एकुण ८६ हजार रू. किं.चा मुद्देमाल** हस्तगत करण्यात आला असुन सदर इसमाविरूध्द **MIDC सिन्नर पोलीस ठाणेस भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो,** व अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड सो** यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक **श्री. अशोक करपे**, सपोनि **श्री. आशिष आडसुळ**,पोहवा प्रकाश चव्हाणके, दिलीप घुले, रविंद्र वानखेडे, पोना प्रितम लोखंडे, पोकॉ किरण काकड, निलेश कातकाडे, संदिप लगड, गोकुळ सांगळे, हेमंत गिलबिले, प्रदिप बहिरम, प्रदिप राठेड यांचे पथकाने सिन्नर एम.आय.डी. सी. परिसरातील अवैधरित्या अग्निशस्त्रे बाळगणारे परप्रांतीय इसमास ताब्यात घेवुन कारवाई केली आहे. **स्थानिक गुन्हे शाखेचे** पथकाने गेल्या पंधरवाडयात **अवैधरित्या अग्निशस्त्र** बाळगणारे **एकुण ०७ आरोपीतांविरूध्द** भारतीय हत्यार कायद्यान्वये कारवाई करून **०५ देशी बनावटीचे पिस्टल व ०१ गावठी कट्टा**, **१५ जिवंत काडतुसे**, ०६ मॅगझिनसह गुन्हयात वापरलेल्या ०३ मोटर सायकल व ०१ स्विफ्ट कार हस्तगत केली आहे. आगामी काळात अवैधरित्या अग्निशस्त्र बाळगणारे इसमांवर अशाच प्रकारे कारवाई सुरू राहणार आहे.